यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : www.ycmou.ac.in https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : scholarship@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (०२५३) २२३००५० / २२३१४७८
शिष्यवृत्ती कक्ष, विद्यार्थी सेवा विभाग Scholarship Section, Student Services Division

**जा. क्र. विसेवि/शिष्यवृत्ती/2026-27/तातडीचे सूचनापत्र/87/117** **दिनांक : 29/06/2026**

# सूचनापत्र शैक्षणिक सत्र 2025-26 तुकडी

## शैक्षणिक सत्र 2025-26 मध्ये शिष्यवृत्ती पर्याय स्वीकारून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी तातडीचे आणि महत्त्वाचे सूचनापत्र

**सुप्रिय विद्यार्थी मित्र,**

ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सत्र 2025-26 (जानेवारी व जुलै तुकडी) मध्ये शिष्यवृत्ती पर्याय निवडून घेतलेला आहे. अशा विद्यार्थ्यांनी शासनाच्या महाडिबीटी 2.0 या संकेतस्थळावरून ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरणे अनिवार्य आहे.

मा. सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे यांचे कार्यालयाकडून दि. 29.06.2026 रोजी प्राप्त झालेल्या सूचनेनुसार सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र 2025-26 मध्ये प्रवेश घेऊन अद्यापही ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज भरलेला नाही, अशा विद्यार्थ्यांनी तातडीने MAHADBT 2.0 या संकेतस्थळावरून परिपूर्ण आवश्यक Documents अपलोड करून ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरावा. शिष्यवृत्ती अर्ज भरल्यानंतर विद्यापीठ संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती टॅबमध्ये दिलेल्या सूचनेतील मेलद्वारे पाठवावयाचे Documents मेलद्वारे पाठवावेत.

ज्या विद्यार्थ्यांनी Documents च्या अपूर्ततेमुळे किंवा इतर कुठल्याही कारणामुळे नियमित शुल्कात प्रवेश घेतलेला आहे, असे विद्यार्थी देखील शिष्यवृत्ती अर्ज भरू शकतात. अशा विद्यार्थ्यांनीही ते शिष्यवृत्तीसाठी पात्र असल्यास व Documents ची पूर्तता करू शकत असल्यास तातडीने शिष्यवृत्ती अर्ज भरावा. पात्रता व शिष्यवृत्तीसंदर्भातील इतर महत्त्वाच्या माहितीसाठी विद्यापीठ संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती टॅबमधील सूचना वाचाव्यात.

ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी mahadbt संकेतस्थळावरून ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरलेला आहे, मात्र अशा विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी असल्यामुळे शिष्यवृत्ती कक्षाकडून/शासकिय विभागाकडून असे अर्ज विद्यार्थ्यांच्या लॉगीनला परत पाठविले असल्यास, अशा विद्यार्थ्यांना Re-Apply करता

येणार नाही, मात्र अशा विद्यार्थ्यांनी MAHADBT 2.0 पोर्टलवरून तातडीने नव्याने सर्व आवश्यक Documents अपलोड करून परिपूर्ण शिष्यवृत्ती अर्ज भरायचा आहे

मा. सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे यांचे कार्यालयाकडून दि. 29.06.2026 रोजी प्राप्त झालेल्या सूचनेनुसार शैक्षणिक सत्र 2025-26 च्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची अंतिम मुदत 30 सप्टेंबर 2026 आहे. परंतु विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीची वाट न बघता तातडीने शिष्यवृत्ती अर्ज भरावेत.

शैक्षणिक सत्र 2026-27 (जानेवारी तुकडी) मध्ये शिष्यवृत्ती पर्याय निवडून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनीही तातडीने महाडिबीटी 2.0 या संकेतस्थळावरून ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज भरायचाय.

(मूळ प्रतीवर मा. संचालक, विसेवि यांची स्वाक्षरी आहे)

**संचालक,**
**विद्यार्थी सेवा विभाग,**
**य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक**